**<u>ई–फाईलींग</u>**

**इतर किरकोळ फौ. अर्ज. क्र. ३७७/२०२४**

निशाणी क्र. १ खाली

# <u>फिर्यादीचे सत्यपाण</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की –

माझे नाव – लक्ष्मण पंढरीनाथ भोसले

वय – ६५ वर्ष, व्यवसाय – सेवानिवृत्त

राहणार – वडूजकर इस्टेट, शिवाजी नगर, जळोची, बारामती,
ता. बारामती, जि.पुणे.

१. देविदास नागनाथ गायकवाड यांनी फौजदारी खटला क्र. ५९९/२०१७ ही एन. आय. ॲक्ट १३८ अन्वये माझ्या विरुध्द दाखल केले आहे. सदरची केस माझ्या विरुध्द सुमारे तीन वर्ष न्यायालयात प्रलंबित होती. देविदास याने सदर फिर्यादमध्ये दुरुस्तीचा अर्ज दिला होता. जुन २०१६ च्या ऐवजी ऑक्टोबर २०१६ पैसे देण्याच्या तारखेबाबत दुरुस्ती मागितली होती. सदरचा अर्जास मी विरोध केला होता तथापी मा. न्यायालयाने अर्ज मंजुर केला. तोपर्यंत फिर्यादीने त्याचा पुरावा न्यायालयात सादर केला होता व सदर पुराव्यामध्ये जुन २०१६ या तारखेप्रमाणे पुरावा देण्यात आला होता. सदर दुरुस्ती आदेशामुळे फिर्यादीचे पुराव्याचे, प्रतिज्ञापत्र, सरतपासणीचे शपथपत्र इत्यादीमध्ये बदल झाले होते. त्यामुळे मी फिर्यादीला केलेले उलटतपास फिर्यादीच्या झालेल्या पुराव्यामध्ये बदल झाला होता.

२. मी फिर्यादीच्या विरुध्द बारामती न्यायालयात ॲट्रोसिटी कायद्यान्वये केस क्र. ७४/२०१९ ने दाखल केली होती. सदर केसमध्ये पोलीसांनी फौ. प्र. संहितेचे कलम २०२ अन्वये न्यायालयात अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये फिर्यादीने ११

गुंठे जमीनीच्या खरेदीसाठी मला रक्कम रु. ७,००,०००/- दिल्याचे नमूद केले होते. परंतू फिर्यादीने सदर रक्कम कधीही दिली नाही. फिर्यादीने फ्लॅट खरेदी करण्यासाठी मला रक्कम रु.७,००,०००/- दिलेबाबतचे वरील नमूद कलम १३८ अन्वये केसमध्ये कथन केले आहे. मला सदर प्रकरणाची नोटीस कधीही मिळाली नाही. फिर्यादीने खोटे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व माहिती न्यायालयात सादर केल्यामुळे मी प्रस्तुतचा अर्ज जाबदेणार (फिर्यादी) विरुध्द दाखल केली आहे. त्यामुळे माझी या न्यायालयास विनंती आहे की, आरोपीस कडक शासन व्हावे व मला न्याय मिळावे.

............................. समक्ष

फिर्यादीची सही / अंगठा

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI
Date: 2025.04.23 14:07:17 +0530

( एम. एच. फारुकी )

दिनांक- २२/०४/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, इंदापूर.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | Shri. Chalwade G.S. (Stenographer-3) |
| Court Name | :- | Shri. M.H. Farooqui,<br>Jt. Civil Judge (Jr. Dn.) and J.M.F.C.,<br>Indapur, Dist. Pune. |
| Date | :- | 22/04/2025 |
| Order signed by the presiding officer on | :- | 22/04/2025 |
| Order uploaded on | :- | 23/04/2025 |